आजचा दिनविशेष
१९२० : अमेरिकन महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार १८ ऑगस्ट २०२५ | अंक २४० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Touriism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक 1st TIME in TRAVEL INDUSTRY
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या
ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका
व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

## लाडक्या बहिणीनंतर आता लाडकी सून योजना, एकनाथ शिंदेंची मोठी घोषणा



सुरुवातीला समुपदेशनाद्वारे कुटुंबामध्ये समेट घडवण्याचा प्रयत्न केला जाईल. जर ही पद्धत अयशस्वी ठरली, तर मग आपली शिवसेना स्टाईल आहेच. या योजनेत केवळ अन्याय झालेल्या सुनांनाच नाही, तर चांगल्या सासूंचाही सन्मान केला जाणार आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले. राज्याच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांच्याकडे या योजनेची राज्यस्तरावरची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. ही मोहीम राज्यभर राबवली जाणार असून, प्रत्येक शिवसेना शाखेतून पीडित महिलांना मदत केली जाईल.

गेल्या काही महिन्यांपासून घरगुती हिंसाचाराच्या घटना सातत्याने वाढत आहेत. या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी शिवसेनेने आता एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यात 'लाडकी बहीण योजने'च्या यशानंतर आता 'लाडकी सून योजना' सुरू करण्यात आली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकतंच ठाण्यात या योजनेचा भव्य शुभारंभ करण्यात आला. ज्या सुनांचा सासरच्या मंडळींकडून शारीरिक किंवा मानसिक अत्याचार होतात, त्यांना तात्काळ मदत मिळावी या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर एक हेल्पलाईन नंबरही जारी करण्यात आला आहे. एकनाथ शिंदे यांनी नुकतंच ठाण्यात एका कार्यक्रमाला हजेरी लावली. यावेळी एकनाथ शिंदेंनी लाडकी सून योजना सुरु करत असल्याचे जाहीर केले. ज्याप्रकारे घरांमध्ये लाडकी मुलगी असते पण लाडकी सून मात्र नसते, अशा विचारधारेला छेद देऊन प्रत्येक सून ही लाडकीच असली पाहिजे, या उद्देशाने शिवसेनेकडून ही योजना सुरु करण्यात आली आहे. यामध्ये केवळ पीडित सुनांनाच नाही, तर चांगल्या सासूंचाही सन्मान केला जाणार आहे, जेणेकरून समाजात एक सकारात्मक संदेश जाईल. हेल्पलाइन नंबर जारी या मोहिमेअंतर्गत, घरगुती हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांसाठी एक विशेष हेल्पलाइन नंबर देण्यात आला आहे. 8828862288 असा हा हेल्पलाईन नंबर असणार आहे. या मोहिमेत शिवसेना शाखा आणि कार्यालयेही सहभागी होणार आहे. तसेच पीडित महिलांना तातडीने मदत पुरवली जाईल. यावेळी एकनाथ शिंदेंनी या योजनेबद्दल आपले मत व्यक्त केले. "जशी आपली मुलगी असते, तशीच सूनही असते. तिलाही सन्मानाने वागवले पाहिजे. अनेक घरांमध्ये सुनांवर अत्याचार होतात, त्यांना त्रास दिला जातो. याला आळा घालण्यासाठी आम्ही ही योजना सुरू केली आहे. ज्या सुनांना मदत हवी असेल, त्यांनी न घाबरता या हेल्पलाइनवर संपर्क साधावा." असे आवाहन एकनाथ शिंदेंनी केले.

## सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी मिरवणूक संपन्न

आष्टी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या सप्तशतोकोतर सुवर्ण महोत्सवी.. ७२५ व्या जयंती निमित्त माऊलींची पालखी मिरवणूक आणि वारकरी सांप्रदायिक दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.. या शोभायात्रा आणि दिंडीमुळे आष्टी शहर भक्तिमय झाल्याचे दिसून येत होते.या शोभायात्रेत आष्टी मतदार संघाचे आमदार सुरेश धस व नगरपंचायत चे मुख्याधिकारी तथा नायब तहसीलदार बाळ दत्त मोरे यांनी सहभाग झाले होते. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून.. कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या सप्तशतकोत्तर ७२५ व्या सुवर्ण महोत्सवी जयंती निमित्त राज्यभरातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थां,नगरपंचायत, नगरपरिषद, या ठिकाणी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीची मिरवणूक आणि वारकरी संप्रदायाच्या जयघोषात दिंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात येत आहे.या पार्श्वभूमीवर आष्टी नगरपंचायत कार्यक्षेत्रामध्ये भाविकांच्या उत्साहात आणि भक्तिभावाने माऊलींचा भव्य पालखी सोहळा आयोजित करण्यात आला.



## नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्या- सचिन शिंदे



नेकनूर मंडळासह परिसरातील भागात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे शेती पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी,अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे. सततच्या पावसामुळे शेतामधील कांदा पिक अक्षरशः नेस्तनाबूत झाले आहे.सोयाबीन,कापूस,मुग, उडीद या पिकासह अन्य पिकांना सुध्दा हानी पोहोचली आहे.काही शेतकऱ्यांचे मुग व उडीद पीक हाती येऊन गेले अशी परिस्थिती झाली आहे. सततच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेती पिकाचे नुकसान झाले आहे,तसेच फळबागांना देखील या पावसामुळे मोठ्या प्रमाणात फटका बसलेला आहे.सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या संपूर्ण शेतकऱ्यांचे पिकांचे पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केली आहे.

## साहित्य संवादात 90 टक्के वाटा दृष्यांचा ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद जोशी यांचे निरीक्षण




प्रतिनिधीनागपूर साहित्यिक, लेखक आणि कवी हा अनुभुतीतून जाणवलेल्या गोष्टी साहित्यातून मांडत असतो. मात्र यात शब्दांचा वाटा हा केवळ ७ टक्के आहे. उर्वरित ९० टक्क्यांहून अधिक वाटा हा साहित्य घडविणाऱ्या लेखकाला दिसलेल्या दृष्यांचा असतो. त्यामुळे संवाद प्रक्रियेत दृष्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते, असे ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी येथे सांगितले. साहित्य आणि मराठी भाषेच्या क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल ज्येष्ठ साहित्यिक जोशी यांचा मुंबई येथील एस. व्ही. एस. कला प्रतिष्ठानच्यावतीने विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. हिंदी मोर भवन येथील नटराज सभागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंजाबराव कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शरद निंबाळकर होते. व्यासपीठावर शासकीय राज्य कलाकार पुरस्कार प्राप्त प्रा. नंदकिशोर मानकर, प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. गजानन शेपाळ उपस्थित होते. साहित्यात भाषा, शब्दांचा वाटा नगण्य असल्याचे नमूद करीत जोशी म्हणाले, भाषेला जसे व्याकरण असते तसेच चित्रकला आणि शिल्पकलांनासह इतर कलांनाही व्याकरण असते. ते समजले की समोर दिसत असलेल्या दृष्यांना मूर्त रुप मिळते. यातून घडलेला संवाद प्रवाही होतो. दुर्दैवाने आज संवादातले तंत्र आणि कौशल्य हरवत चालले आहे. साहित्य शिकविणारे मोजके १० टक्के प्राध्यापक साहित्यातले साक्षर आहेत.

## अरणविहरा महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ

आष्टी । अरणविहरा गावातील काही ग्रामस्था सोबत बोलणे सुरू असताना याच दरम्यान बिनबुडाचे आरोप करत अपशब्द वापरून महिला सरपंचाला अश्लील भाषेत शिवीगाळ करण्याचा मुजोरपणा येथील ग्रामरोजगार सेवकाने केला असल्याने याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. आष्टी तालुक्यातील अरणविहरा,तागखेल ग्रुप ग्रामपंचायत असून येथे लोकनियुक्त महिला सरपंच यांचे पती १३ ऑगस्ट रोजी ग्रामस्थासोबत गावातील काही विकासकामा बद्दल चर्चा करत असताना.याच वेळी गावातीलच राजू रघुनाथ रामगुडे या ग्रामरोजगार सेवकाने मुजोरपणा करत महिला सरपंच यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत अश्लील भाषेत शिवीगाळ केली.तर दुसर्या व्यक्तीने सरपंचपती यांना सरपंच नालायक आहे.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त 'इंस्पायर क्लासेस' तर्फे शालेय साहित्य वाटप.

पळशी : स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासत इंस्पायर क्लासेस, पळशी यांच्यातर्फे परिसरातील ग्रामीण भागातील दोन जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद शाळा सटवाई वाडी व जिल्हा परिषद शाळा महेर वस्ती, पळशी या दोन वस्ती शाळांमध्ये एकूण दोन टप्प्यांत साहित्य वितरण करण्यात आले. १४ ऑगस्ट रोजी सटवाई वाडी येथील विद्यार्थ्यांना रजिस्टर, पेन, पेन्सिल, पट्टी, स्केचपेन, शार्पनर आणि इरेझर यांचे वाटप करण्यात आले. यावेळी इंस्पायर क्लासेसचे संचालक श्री. सुनिल



शिवलाल राजपूत यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आशिष घोडके सर यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. १५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद शाळा महेर वस्ती येथे स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवानंतर विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक गोपाल महेर सर, ग्रामस्थ, तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाविषयी बोलताना सुनिल शिवलाल राजपूत म्हणाले, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचालीसाठी ज्या कोणत्याही प्रकारचे सहाय्य हवे असल्यास त्यांनी निर्धास्तपणे 'इंस्पायर क्लासेस'शी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देणे, हीच आमची खरी जबाबदारी आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. इंस्पायर क्लासेसने दाखवलेली ही सामाजिक बांधिलकी निश्चितच प्रेरणादायी असून इतर शैक्षणिक संस्थांनी यांचा आदर्श घ्यावा, असेही ग्रामस्थांनी यावेळी नमूद केले.

## ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक श्री चंद्रकांत पाटणकर यांचा सन्मान

प्रतिनिधी मुंबईतील ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक श्री चंद्रकांत पाटणकर यांनी गेली अनेक वर्षे जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांसह सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातील वैगुण्यावर निर्भीडपणे पत्रलेखन केले त्यांचे हे सामाजिक उत्तरदायित्व लक्षात घेऊन दैवज्ञ हितवर्धक समाज दादर मुंबई या संस्थेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. पाटणकर हे गेली तीस वर्ष सातत्याने सर्व वर्तमानपत्रातून पत्रलेखन करीत आहेत. त्यांच्या अनेक पत्रांची दाखल घेऊन संबंधित यंत्रणांनी निराकरण केले आहे, त्यांच्या पत्रलेखनाचे पत्रप्रपंच या नावाने दोनदा पुस्तक रूपाने प्रकाशन झाले आहे, वृत्तपत्रलेखनाबद्दल त्यांना अनेक पुरस्काराने आजपर्यंत सन्मानित करण्यात आले आहे. समाजश्रेष्ठी श्री दिनकर बायकेरीकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह,शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रसिद्ध उद्योजक डॉ आनंद पेडणेकर, गणेश नागवेकर, नाना शंकरशेट प्रतिष्ठानचे सरचिटणीस ॲड मनमोहन चोणकर, हितवर्धक मंडळाचे अध्यक्ष श्री सुभाष हरचेकर आणि कार्यकारणी मंडळाचे पदाधिकारी, पाटणकर सपत्नीक कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी श्री चंद्रकांत पाटणकर यांनी संस्थेला नाना शंकरशेट यांची भव्य प्रतिमा संस्थेला भेट दिली, त्याचे अनावरण डॉ आनंद पेडणेकर यांनी केले.

## ग्रामीण भागाला सिमेंट रस्ते जोडण्याच्या मुख्यमंत्री , ग्रामविकासमंत्री यांच्या घोषणा कागदावरच ; लोकवर्गणीतून रस्ते ग्रामीण जनतेची शोकांतिका :- डॉ.गणेश ढवळे

बीड:- ( दि.१७ ) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत १००० लोकसंख्या असलेल्या गावातील प्रमुख रस्ते सिमेंट क्राकीटचे करण्यात येणार असुन त्यासाठी १८ हजार कोटी रूपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा केली. तर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना वस्त्यापर्यंत पोहोचण्यासाठी सुसज्ज रस्ते मिळावेत. यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ग्रामीण भागाला जोडणारे १० हजार किलोमीटर पर्यंत व्हाईट टॉपिंगचे सिमेंटचे रस्ते तयार करणार येणार असल्याची घोषणा केली. मात्र ग्रामीण भागातील लोकांना लोकवर्गणीतून रस्ते करण्याचे वेळ आली असून एकंदरीतच शासनाच्या घोषणा व योजना केवळ कागदावरच राबवले जात असून वस्तुस्थिती वेगळी असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेशकर यांनी बोलून दाखवली.बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील सरपंच विश्वंभर गिरी यांनी महाजनवाडी ते बोरखडे पंतप्रधान पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याच्या दुरावस्थेसाठी वारंवार शासन दरबारी पाठपुरावा करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर ग्रामपंचायत मार्फत रस्ता दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याची ग्रामपंचायत मार्फत दुरुस्ती :- विश्वंभर गिरी , सरपंच महाजनवाडी बोरखेड -महाजनवाडी पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत रस्त्याची थातुरमातुर दुरुस्ती केली जाते. प्रशासनाकडे वारंवार निवेदनाद्वारे पाठपुरावा करूनही प्रशासन दुर्लक्ष करत आहे. ग्रामस्थांना दुधदुभते, बाजारहाट, शालेय विद्यार्थी, दवाखाना याठिकाणी जाण्यासाठी अडचणी येत असल्याने शेवटी ग्रामपंचायत मार्फत रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले असल्याचे महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी सांगितले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य विशाल घरत,बबन घरत, संजय घरत, शंकर घरत, ऋषिकेश घरत आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

सरकारच्या योजना कागदावरच; लोकसहभागातून रस्ते करण्याची ग्रामस्थांवर वेळ दुर्दैवी :- डॉ.गणेश ढवळे सरकार मातोश्री पाणंद रस्ते योजना असेल अथवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांनी गावपातळीवर सिमेंट कॉंक्रीट रस्ते करण्याची घोषणा असेल या घोषणा केवळ कागदावर राहत असून ग्रामीण भागातील लोकांना पावसाळ्यात शेतमाल ,बि-बियाणे, दुध दुभते, बाजारहाट,शाळकरी मुलं दवाखाने आदींसाठी रस्त्यासाठी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही निधी उपलब्ध करून न दिल्याने अखेर लोकसहभागातून रस्ते करण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे. ही बाब अत्यंत दुर्दैवी असल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ. गणेश ढवळे यांनी दिली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

सोमवार १८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## मानसिक दिव्यांग मुलांची सदिच्छा भेट, सुसंवाद



मुंबईतील कबुतरखान्याचा वाद आता चांगलाच पेटला आहे. कबुतरांमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होत असल्याच्या तक्रारींनंतर, मुंबई महानगरपालिकेने (BMC) शहरातील कबुतरखाने बंद करण्याचा कठोर निर्णय घेतला आहे. हा वाद नुकताच सर्वोच्च न्यायालयात पोहोचला होता, जिथे दादरमधील एका कबुतरखान्याबाबत दाखल केलेली विशेष याचिका फेटाळण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात निर्णय होईल असे स्पष्ट केले आहे. यामुळे कबुतरांमुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांवर पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

कबुतरांमुळे होणाऱ्या आजारात भारतात 50 टक्क्यांनी वाढ

कबुतरांमुळे श्वास घेण्यास अडचणी होतात, असे म्हटले जाते. कबुतरांमुळे होणाऱ्या आजारांवर फुफ्फुस आणि श्वसनप्रणालीचे तज्ज्ञ असलेले डॉ. दीपक भानुशाली यांनी गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, कबुतरांमुळे हायपरसेन्सिटिव्हिटी न्यूमोनिटिस (Hypersensitivity Pneumonitis) हा धोकादायक आजार होतो. हा आजार भारतात, विशेषतः मुंबई आणि महाराष्ट्रात खूप सामान्य झाला आहे. इतर देशांच्या तुलनेत हा आजार भारतात 50 टक्क्यांनी वाढला आहे. आम्ही दर महिन्याला या आजाराचे 2 ते 3 रुग्ण पाहतो. या आजारावर उपचार करणे अत्यंत अवघड आहे, अशी माहिती डॉ. दीपक भानुशाली यांनी दिली. लक्षणं काय?

हायपरसेन्सिटिव्हिटी न्यूमोनिटिस हा आजार कबुतरांच्या विष्ठेतील किंवा त्यांच्या पंखांमधील सूक्ष्म कणांमुळे होतो. हे कण श्वासावाटे शरीरात गेल्यावर फुफ्फुसांना गंभीर इजा होते. या आजारामुळे फुफ्फुसे कायमची निकामी होऊ शकतात. या आजाराच्या रुग्णांना सुरुवातीला ताप येतो, नंतर त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. या आजारावर कोणताही निश्चित उपाय नाही. उपचारासाठी स्टेरॉइड्सचा वापर केला जातो, पण त्याचे अनेक दुष्परिणाम आहेत. या आजारातून पूर्णपणे बरे होण्यासाठी फुफ्फुस प्रत्यारोपण हा एकच मार्ग आहे, जो अत्यंत खर्चिक असल्याने सर्वसामान्यांना परवडणारा नाही. त्यामुळे, या आजारापासून दूर राहणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे, असेही डॉ. दीपक भानुशाली यांनी सांगितले.

पशुवैद्यक डॉ. देवयानी कायंदे यांनीही कबुतरांमुळे होणाऱ्या धोक्यांची माहिती दिली आहे. "कबुतरांच्या विष्ठेमुळे हवा दूषित होते, ज्यामुळे शरीरात इन्फेक्शन होऊ शकते. कबुतरांच्या अंगावर उवा असतात. यामुळे शहरात आजार पसरण्यास मदत होते. कबुतरे स्वतःचे अन्न स्वतःच शोधू शकतात. लोकांनी त्यांना दाणे टाकणे बंद केल्यास त्यांची संख्या आपोआप कमी होईल. ते इतर ठिकाणी जातील. एकाच ठिकाणी अन्न मिळत असल्यामुळे त्यांची संख्या वाढते. ते तिथेच थांबतात. अनेक देशांमध्ये, विशेषतः सिंगापूरमध्ये, रस्त्यावर उघड्यावर अन्न टाकणाऱ्यांवर दंड आकारला जातो, असे देवयानी कायंदे यांनी सांगितले.

डॉक्टरांचे नागरिकांसाठी महत्त्वाचे सल्ले काय?

कबुतरांच्या संपर्कात जाणे टाळा.

त्यांना दाणे टाकणे पूर्णपणे बंद करा.

कबुतरखान्यांच्या परिसरात राहणाऱ्या लोकांनी मास्क वापरणे अनिवार्य आहे.

धार्मिक किंवा पाप-पुण्याचा मुद्दा नाही

हा धार्मिक किंवा पाप-पुण्याचा मुद्दा नसून, आपल्या आरोग्याचा प्रश्न आहे. त्यामुळे कबुतरांशी जास्त संपर्कात राहू नका. त्यांना खाणं देऊ नका. कबुतरांमुळे होणारा हा आजार प्रत्येकालाच होईल असे नाही, पण ज्यांना मधुमेह किंवा उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांना याचा धोका जास्त असतो. त्यामुळे कबुतरांपासून सुरक्षित अंतर राखणे हाच सध्याचा सर्वात चांगला उपाय आहे. महापालिकेने घेतलेल्या या निर्णयामुळे मुंबईकरांच्या आरोग्याचे रक्षण होण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे, असेही डॉ .दीपक भानुशाली म्हणाले.

# उच्च रक्तदाबाच्या समस्या दूर करण्यासाठी तज्ज्ञांनी सांगितल्या काही जपानी टिप्स



निरोगी आरोग्यासाठी तुमच्या जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल करणे गरजेचे असते. परंतु आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तुमच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देता येत नाही. आहारात पोषणाची कमतरता झाल्यामुळे तुम्हाला अनेक गंभीर आजार होऊ शकतात. आजच्या काळात, उच्च रक्तदाब (बीपी) ही एक सामान्य पण धोकादायक समस्या बनली आहे. वाढत्या रक्तदाबाचा परिणाम हळूहळू हृदय, मूत्रपिंड आणि मेंदूवर होतो. म्हणूनच उच्च रक्तदाबाला सायलेंट किलर देखील म्हटले जाते. त्याच वेळी, ते नियंत्रित करण्यासाठी औषधांसोबतच जीवनशैली बदलणे देखील खूप महत्वाचे आहे. या संदर्भात, एक खास जपानी युक्ती चर्चेचा विषय बनली आहे.

रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी, जपानी संशोधकांनी एक विशेष तंत्र विकसित केले आहे. त्याला 'इंटरव्हल वॉकिंग ट्रेनिंग' असे नाव देण्यात आले आहे. इंटरव्हल वॉकिंग ट्रेनिंग म्हणजे काय आणि ते रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी कसे कार्य करते ते जाणून घेऊया. इंटरवल वॉकिंग ट्रेनिंग म्हणजे काय?

२००७ मध्ये जपानी प्राध्यापक हिरोशी नोज आणि शिझुए मासुकी यांनी इंटरव्हल वॉकिंग ट्रेनिंग विकसित केले. या तंत्रात, चालणे दोन भागात विभागले गेले आहे. इंटरवल वॉकिंग कसे करावे?

३ मिनिटे वेगाने चाला, जेणेकरून तुमचा श्वास जलद होईल आणि तुमच्या हृदयाचे ठोके वाढतील. यानंतर, ३ मिनिटे हळू आणि आरामात चाला.

हा पॅटर्न ५ वेळा पुनरावृत्ती केला जातो. म्हणजे एकूण ३० मिनिटे चालणे ज्यामध्ये १५ मिनिटे वेगाने आणि १५ मिनिटे हळू चालणे असते.

रक्तदाब कसा नियंत्रित केला जातो?

संशोधन अहवालांनुसार, जेव्हा तुम्ही इंटरवल वॉकिंग करता तेव्हा शरीराच्या रक्तवाहिन्या सक्रिय होतात आणि रक्तप्रवाह सुधारतो. इंटरवल वॉकिंग केल्याने सिस्टोलिक बीपी सुमारे 9 मिमी एचजी आणि डायस्टोलिक बीपी सुमारे 5 मिमी एचजीने कमी होऊ शकते. जर तुमचा रक्तदाब वेळोवेळी वाढला तर तुम्ही तुमच्या दैनंदिन दिनचर्येत ही चालण्याची युक्ती समाविष्ट करू शकता. याच्या मदतीने, काही महिन्यांत तुम्हाला आश्चर्यकारक परिणाम दिसू शकतात. या तंत्रामुळे शरीराची ऑक्सिजन घेण्याची क्षमता देखील वाढते, जी उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर आहे.

आणखी बरेच फायदे आहेत

रक्तदाब नियंत्रित करण्याव्यतिरिक्त, इंटरवल वॉकिंग केल्याने तुम्हाला इतर अनेक फायदे मिळू शकतात. यामुळे फुफ्फुसांची क्षमता वाढते. तुमचे पाय मजबूत होतात, ज्यामुळे तुम्ही तुमची दैनंदिन कामे अधिक कार्यक्षमतेने करू शकता. रक्तातील साखर नियंत्रित राहते, ज्यामुळे ते टाइप-२ मधुमेह असलेल्या लोकांसाठी विशेषतः फायदेशीर ठरते. या सर्वांव्यतिरिक्त, दररोज थोडा वेळ चालल्याने मूड चांगला राहतो, झोप गाढ येते आणि ताणतणावही कमी होतो.

### कसे सुरू करावे?

सुरुवातीला, फक्त एक मिनिट वेगाने चालणे आणि ३ मिनिटे हळूहळू चालणे सुरू करा. हळूहळू ३ मिनिटे वेगाने चालणे आणि ३ मिनिटे हळूहळू चालणे सुरू करा. या दरम्यान, नेहमी तुमची पाठ सरळ ठेवा आणि तुमची नजर पुढे ठेवा. तसेच, सुरुवातीला, दुसऱ्या व्यक्तीच्या देखरेखीखाली असेच चालत जा.

# कोण आहेत एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन? असा आहे राजकीय प्रवास



जयदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर उपराष्ट्रपतीपद रिकामे झाले आहे. यासाठी लवकरच निवडणूक होणार आहे. अशातच आता एनडीएकडून सीपी राधाकृष्णन यांच्या नावाची उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून घोषणा झाली आहे. आज झालेल्या एनडीएच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीही या बैठकीला हजर होते. बैठकीनंतर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी याबाबत घोषणा केली. सीपी राधाकृष्णन कोण आहेत ते जाणून घेऊयात.सीपी राधाकृष्णन हे तामिळनाडूतील भाजपचे माजी अध्यक्ष आहेत. त्यांचे पूर्ण नाव चंद्रपुरम पोनुस्वामी राधाकृष्णन आहे. राधाकृष्णन यांचा जन्म 20 ऑक्टोबर 1957 रोजी तामिळनाडूतील तिरुपूर येथे झाला. त्यांनी कोइम्बतूर येथील चिदंबरम कॉलेजमधून बीबीए केले आहे. राधाकृष्णन 1973 मध्ये वयाच्या 1 व्या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील झाले. कालांतराने ते जनसंघात सामील झाले आणि सक्रिय राजकारणात आले. ते सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत.

दक्षिण भारतातील भाजपचे महत्वाचे नेते

सीपी राधाकृष्णन हे दक्षिण भारतातील भाजपच्या महत्वाच्या नेत्यांपैकी एक आहेत. ते भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारी समितीचे सदस्यही आहेत. ते केरळचे प्रभारी देखील होते. 2016 ते 201 पर्यंत ते अखिल भारतीय कॉयर बोर्डाचे अध्यक्ष होते. 2004, 2012 आणि 2019 च्या लोकसभा निवडणुकीत ते कोइम्बतूर लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार होते. त्यांचा राजकीय प्रवास खालीलप्रमाणे...

राज्यपाल महाराष्ट्र- 31 जुलै 2024 पासून आतापर्यंत झारखंड – 18 फेब्रुवारी 223 ते 30 जुलै 2024 पर्यंत तेलंगणा – मार्च ते जुलै 202 पर्यंत अतिरिक्त कार्यभार. पुदुच्चेरी- मार्च ते ऑगस्ट 2024 पर्यंत उपराज्यपाल (अतिरिक्त कार्यभार).

खासदार

# भाजपसोबत शरद पवारांनाच युती करायची होती पण..., 2014 ला काय घडलं? प्रफुल्ल पटेलांचा मोठा गौप्यस्फोट



राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे, प्रफुल्ल पटेल यांनी केलेल्या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. ते गोंदियात महायुतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभामध्ये बोलत होते. 2014 मध्येच ठरलं होतं की, भाजपने शिवसेनेचा आणि राष्ट्रवादीने काँग्रेसचा हात सोडायचा आणि सत्तेत यायचं, मोठ्या साहेबांची (शरद पवार) यांची आणि आमची खूप दिवसापासूनची भाजपसोबत यायची इच्छा होती, असं प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलं आहे प्रफुल्ल पटेल यांनी भाजपसोबतच्या युतीबाबत मोठा गौप्यस्फोट केला आहे. भाजपासोबत येण्याची खूप आधीपासून आमची आणि मोठ्या साहेबांची (शरद पवार) यांची देखील इच्छा होती. मात्र, गाडी स्लीप होऊन जात होती. 2014 च्या निवडणुकीत आम्ही काँग्रेसचा हात सोडायचा आणि भाजपवाल्यांनी शिवसेनेचा हात सोडायचा असं ठरलं होतं, असा मोठा गौप्यस्फोट प्रफुल्ल पटेल यांनी गोंदियामध्ये बोलताना केला आहे, प्रफुल्ल पटेल यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, 2014 च्या निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी मी स्वतः बाहेरून पाठिंबा देत असल्याची घोषणा केली होती, आणि आमच्या सहकार्याने हरिभाऊ बागडे स्पीकर म्हणून निवडून आले. मात्र, पुन्हा गडबड झाली आणि आम्ही मागे राहून गेलो.

## राहुल गांधींवर हल्लाबोल

राहुल गांधी यांनी मतदान चोरीचा आरोप केला आणि त्याच्यानंतर बिहारमधून आज त्यांनी वोट अधिकार यात्रा सुरू केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना प्रफुल्ल पटेल यांनी राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. राहुल गांधींना निवडणुकीच्या 6 महिन्यानंतर जाग आली आणि ते वोट चोरीचा आरोप करत आहेत. निवडणूक होती तेव्हा असा कोणीही आरोप केला नाही. महाराष्ट्रामध्ये देखील एकाही पक्षाने त्यावेळी तक्रार केली नाही, की वोट वाढलेत म्हणून. महाराष्ट्रामध्ये कुठल्याही प्रकारची वोट चोरी आणि बूथ कॅप्चर होऊ शकत नाही, असं मी सांगू शकतो असं यावेळी प्रफुल्ल पटेल यांनी म्हटलं आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## तुम्ही कधी निळा चहा प्यायलाय का? जाणून घ्या फायदे....



बहुतेक लोक त्यांच्या सकाळची सुरुवात दुधाच्या चहाने करतात, कारण त्यांना माहित आहे की हा चहा आरोग्यासाठी तितका फायदेशीर नाही. दुधाचा चहा पिल्याने पोटात आम्लता आणि छातीत जळजळ यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात. त्याच वेळी, हर्बल चहाच्या नावाखाली, लोक ग्रीन टी आणि आल्याच्या चहापुरते मर्यादित आहेत. परंतु, एक चहा असा देखील आहे जो दिसायला सुंदर नाही तर पिण्यासही स्वादिष्ट आहे आणि अनेक आरोग्य फायदे देखील देतो. ही चहा म्हणजे अपराजिता चहा. क्लिटोरिया टर्नेटिया म्हणजेच अपराजिता फ्लॉवरपासून बनवलेला हा निळा चहा एक नाही तर अनेक आरोग्य फायदे देतो.

आयुर्वेदातही तो आरोग्यासाठी खूप चांगला मानला जातो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही तुमची सकाळ ही निळी चहा पिऊन सुरू केली तर त्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो ते येथे जाणून घ्या. ब्लू टी पिण्याचे अनेक फायदे आहेत. हे एक नैसर्गिक पेय आहे जे क्लिटोरिया टर्नेटिया नावाच्या वनस्पतीपासून बनवले जाते. याला बटरफ्लाय पी किंवा नीलकमळ देखील म्हणतात. याच्या सेवनाने पचन सुधारते, हृदयाचे आरोग्य चांगले राहते, तसेच त्वचेसाठी आणि केसांसाठीही फायदेशीर आहे

ब्लू टी पिण्याचे फायदे....

शरीर स्वच्छ करण्यासाठी ही चहा प्यायली जाऊ शकते. ही चहा पिल्याने शरीर विषमुक्त होते. पोट स्वच्छ होते. ब्लू टी प्यायल्यानंतर लघवीचा प्रवाह सुधारतो, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ सहजपणे बाहेर पडतात. ब्लू चहा पिल्याने ताण कमी होऊ शकतो. यामुळे ताण कमी होतो, आळस आणि आळस येत नाही. कॅफिन नसतानाही, अपराजिता चहा पिल्यानंतर व्यक्तीला सतर्कता जाणवते. अपराजिता फुलांचा चहा मेंदूला निरोगी ठेवतो. या चहाला मेंदूसाठी अमृत म्हणता येईल. त्यात अँटी-ऑक्सिडंट्स असतात जे या चहाला निळा रंग देतात. हे अँटी-ऑक्सिडंट्स मेंदूचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करतात. ब्लू टी रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत करते.. हा प्यायल्याने रक्तातील साखरेची वाढ होत नाही. सकाळी रिकाम्या पोटी हे चहा घेतल्यास दिवसभर रक्तातील साखरेची पातळी सामान्य राहते. अपराजिता फुलांचा चहा डोळ्यांसाठी देखील खूप फायदेशीर आहे. हा चहा प्यायल्याने दृष्टी दीर्घकाळ टिकून राहण्यास मदत होते. त्यात असलेले संयुगे डोळ्यांमध्ये रक्तप्रवाह सुधारतात. दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध असलेला ब्लू टी सांधेदुखी कमी करू शकतो. जर दररोज सकाळी तो प्यायला गेला तर शरीर वेदनांपासून मुक्त राहते.

अपराजिता फुलांच्या ५ ते ६ वाळलेल्या पाकळ्या एक ते दीड कप पाण्यात घालून ५ ते १० मिनिटे उकळवा. त्यात मध आणि थोडा लिंबाचा रस घाला आणि चाखल्यानंतर प्या. अपराजिता फुलांच्या चहामध्ये (अपराजिता के फूलों की चहा) साखर घालू नका. लक्षात ठेवा की कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईट असतो आणि म्हणूनच हा चहा मर्यादित प्रमाणात

# जोगेश्वरी टायकल मित्र मंडळाची हंडी फोडली विश्वविक्रम करणाऱ्या कोकण नगर मंडळाने

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी टायकल मित्र मंडळ बाल विकास शाळेजवळ, सर्वोदय नगर, जोगेश्वरी पूर्व या मंडळाची दहीहंडी ज्यांनी मुंबईत सर्वप्रथम दहा थर लावून विश्वविक्रम केला त्या कोकण नगर या स्थानिक मंडळाने सात थर लावून फोडली. मागील अनेक वर्षांपासून सर्वोदय नगर बाल विकास शाळेसमोर टायकल मित्र मंडळाच्या वतीने भव्यदिव्य दहीहंडीचे यशस्वी आयोजन करण्यात येते.यंदा देखील १०० ते १५० गोविंदांनी या ठिकाणी येऊन सलामी दिली त्यांना देखील सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. कोकण नगर मंडळाने हंडी फोडल्याने त्यांना एकूण चार सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे सचिव राजेश खरात, अनंत तेली, प्रशांत सावंत, प्रवीण ठाकूर, राकेश डोनोलीकर, सिद्धेश कामत, मंदार परब, दत्ता राऊलकर, जयसिंग कांबळे, समीर मसुरकर, गीतेश घोणसेकर आदी मान्यवरांनी खूप मेहनत घेतली.मंडळाच्या वतीने अनेक सामाजिक उपक्रम दरवर्षी राबविले जातात.



# पलपब प्रकाशन नवी मुंबई साहित्य परिवाराच्या वतीने आयोजित स्वातंत्र्य दिनानिमित्त ऑनलाईन काव्यसंमेलन उत्साहात संपन्न

. नवी मुंबई- दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी पलपब प्रकाशन नवी मुंबई साहित्य परिवाराच्या वतीने ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राज्य स्तरीय ऑनलाईन काव्य संमेलन २०२५ आयोजित करण्यात आले होते. पलपब पब्लिकेशनच्या सर्वेसर्वा सौ.लीनाताई पाटील मॅडम, पलपब महाराष्ट्र राज्य अध्यक्ष कवी, लेखक श्री.किरण तोडकर सूर्यवंशी तसेच पलपब पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष कवी, लेखक श्री.संदीप पवार सर आयोजक होते.तर पलपब नवी मुंबई कार्यकारिणी संयोजक म्हणून काम केले.१ ऑगस्ट २०२५ पासून व्हाटस् अॅप लिंक वर कवी/कवयित्री यांना ऑनलाईन काव्य संमेलनात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार ३० सारस्वतांनी नोंदणी केली होती. दि.१५ ऑगस्ट रोजी दुपारी ४:०० वाजता Google meet अॅप वर काव्य संमेलनाची सुरुवात झाली.नवी मुंबई पलपब अध्यक्ष श्री. जयराम मांजरे-पाटील (कवी, लेखक आणि प्रेरणादायी वक्ते) यांनी सहभागी मान्यवरांचे शब्द सुमनाने स्वागत केले.त्यानंतर त्यांनी अतिशय सुंदर प्रकारे कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले.त्यांतर सहभागी कवी कवयित्री यांनी 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या विषयाच्या अनुषंगाने सादरीकरण केले. सहभागी सारस्वत आणि त्यांच्या कवितेचे शीर्षक पुढीलप्रमाणे होते. श्री.दिलीप देवराम जाधव= पालघर विषय:-स्वातंत्र्यता संग्राम जहाँआरा रंगरेज= वडोदरा( गुजरात ) विषय :- जश्न ए आज़ादी सौ. शशिकला शिवाजी कुंभार= ठाणे विषय:- भारत माँ सौ.सुरक्षा पाटील= टिटवाळा विषय:- स्वातंत्र्य गान श्री. सुदाम कटारे = मुंबई विषय:- स्वातंत्र्य अतुल मोरे=मोहोळ, जि. सोलापूर विषय :-स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव श्री.ज्ञानेश्वर शांता विठ्ठल चौरे= नाशिक विषय :- वंदना कौसर दिवान =अहमदाबाद( गुजरात) विषय:- हिंदुस्तान मेरी पहचान श्री.गजानन दिनाजी चौहान =परभणी विषय:- टेक ( प्रतिज्ञा) श्री. सचिन अनंता ढाकणे= बार्शी जि.सोलापूर विषय:- अमृत महोत्सव श्री.प्रशांत मधुकर बचूटे=विरार जि.पालघर विषय :-जवान अॅड. रश्मी अशोक पाटील= नांदगाव, पालघर विषय :- स्वातंत्र्य हा मुक्त श्वास कु. युवराज्ञी सोनवणे (काव्यराज्ञी) ओतूर. ता. जुन्नर, जि. पुणे. विषय :- कफनवीर वंश कांता संजय काळे =नागपूर विषय :-भारत राहिला पाहिजे श्री.स्वप्नील शंकर पाटील = भिवंडी विषय :- स्वातंत्र्याचे अमृत गान सौ. प्रतिक्षा अविनाश ठाकरे= विषय:- सैनिक श्री. बाळकृष्ण दत्तात्रेय घरत = पनवेल(रायगड) विषय:- म्हणजे स्वातंत्र्य सौ.सरोज सुरेश गाजरे= भाईंदर( ठाणे) विषय:- सांस्कृतिक धारा सौ.नंदा कोकाटे:- ठाणे विषय:- माझी प्रिय मायभूमी श्री.राजेंद्र सातवी सर= अबुधाबी (संयुक्त अरब अमीरात UAE) विषय:- मेरी पहचान ही तिरंगा है कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय सुंदर शब्दांत पलपब नवी मुंबई उपाध्यक्ष श्री.विलास राठोड सर व श्री.गोरखनाथ यादव यांनी केले. सौ.लीना पाटील यांनी मनोगत व्यक्त केले आणि सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.नवी मुंबई कार्यकारिणीचे अभिनंदन केले.श्री.किरण तोडकर यांनी मनोगत व्यक्त केले आणि नवी मुंबई कार्यकारिणी जाहीर केली.तसेच मार्गदर्शन केले. नवी मुंबई सचिव श्री. संतोष शिरावले यांनी सुंदर शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. नवी मुंबई कार्यकारिणीतील ग्राफिक डिझायनर श्री.सनी ढाकणे सर यांनी ओजस्वी शब्दांत आभार प्रदर्शन केले.




# गोरेगाव टेम्पो चालक मालकांची उत्साहात दहीहंडी

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी गोरेगाव टेम्पो चालक मालक असोसिएशन चे वतीने गोरेगाव पूर्व येथील जयकोच टेम्पो नाका येथे मंडळाने ४१ व्या वर्षी दहीहंडी बांधली होती.सलामी साठी साधारण ६० चे आसपास मंडळ आली होती.त्या प्रत्येक मंडळाच रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला.दरवर्षी इथे रामनवमी उत्सव देखील मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. अनेक सामाजिक उपक्रम मंडळ राबवित असते. अध्यक्ष प्रकाश माने, कार्याध्यक्ष रवींद्र पालांडे, खजिनदार संतोष जठार, प्रकाश मुद्रस आणि अनेक पदाधिकारी कार्यकर्ते यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली होती.

# समाजहित घडविणाऱ्या संस्थेचे कार्य सुरु राहावे : चंद्रशेखर उपरकर

## कणकवली येथे जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार वितरण

कणकवली (प्रतिनिधी) : समाजकार्य कधीही कमी होत नाही आणि जनजागृती सेवा संस्था तर पाच जिल्ह्यात विविध माध्यमातून सामाजिक कार्य अविरतपणे करत आहे. त्यात्या भागातील समस्या जाणून घेऊन तसे कार्य करणारी संस्था महत्वाची ठरते. असे समाजहित घडविणाऱ्या या संस्थेचे कार्य असेच सुरू राहावे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त अधिकारी चंद्रशेखर उपरकर यांनी केले. ते कणकवली येथील जनजागृती सेवा संस्थेच्या राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अभिनेत्री अक्षता कांबळी, श्री चौडेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा



राजश्री धुमाळे, वास्को गोवा येथील कवयित्री, समुपदेशक शुभांगी गुरव, सामाजिक कार्यकर्ते राजू मानकर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने आणि गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी बोलताना अभिनेत्री अक्षता कांबळी म्हणाल्या की, दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान निर्माण होत असेल तर त्याच्यापेक्षा मोठे समाधान कोणतेच नाही. नेमकेपणाने तेच कार्य या संस्थेच्या माध्यमातून मुंबईपासून सिंधुदुर्ग पर्यंत सातत्याने होत आहे. यावेळी राजश्री धुमाळे, शुभांगी गुरव यांनी मनोगत व्यक्त केले.

समाजरत्नांचा गौरव,

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महेश सावंत, निकेत नरहरी पावसकर, सहदेव धरणे, डॉ. संजीव लिंगवत, अक्षय मेस्त्री, सुरेश कदम, दत्ताराम टोपले, राजेंद्र बिड्ये, निलेश गवंडी,दत्तप्रसाद आदिती सामंत, संध्या तेरसे, सागर तळवडेकर, मिहिर मठकर, संतोष टक्के प्राची तावडे, अजय गुरसाळे यांना सन्मानपत्र,संस्थेचा अहवाल,आरती संग्रह, भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुरस्कार प्राप्त मान्यवरांमधून दत्ताराम टोपले, सुरेश कदम, माहिर मठकर, संतोष टक्के, अजय गुरसाळे यांनी मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.सूत्रसंचालन भरत तोरसकर यांनी करून श्रुती उरुणकर यांनी आभार मानले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी गंधाली तिरपणकर, श्रुती उरुणकर, दत्ता कडुलकर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचा शेवट सहदेव धरणे यांनी घातलेल्या मालवणी गाऱ्हाण्याने झाली.

# अन्यायग्रस्त शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित, शिक्षणाधिकाऱ्यांनी नेमली चार सदस्यीय चौकशी समिती

जालना (वार्ताहर )दि१६ आपल्या न्याय मागण्यासाठी कै. नानासाहेब वाघ माध्यमिक विद्यालय नजीक पांगरी ता बदनापुर येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद जालना यांच्या कार्यालयासमोर दि १४ ऑगस्ट ला उपोषण सुरू केले होते उपोषणादरम्यान प्रभारी शिक्षणाधिकारी रवी जोशी , केंद्रप्रमुख गणेश गिराम व त्यांचे शिष्टमंडळ वरिष्ठ सहाय्यक प्रसन्न कुमार जोगदंड, कनिष्ठ लिपिक अनिल भेरे यांनी मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी व उपोषण कर्ते यांच्याशी चर्चा केली. परंतु उपोषणकर्ते आपल्या मागण्यावर ठाम होते.जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत उपोषण सुरूच राहणार ! अशी ठाम भूमिका उपोषणकर्त्यांनी घेतली. उपोषणकर्त्यांनी दि ९ जुलै २०२५ च्या पत्रानुसार माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळू खरात यांना आपल्या वर मुख्याध्यापक तथा सचिव प्रल्हाद वाघ यांच्याकडून होणाऱ्या अन्याया विरोधात दाद मागितली होती मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सुद्धा शिक्षणाधिकारी यांच्याकडे वारंवार पत्र व्यवहार करून तसेच प्रत्यक्ष भेटीदरम्यान चर्चा केली होती त्याच अनुषंगाने २२ जुलै २०२५ ला माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी गटशिक्षणाधिकारी बदनापूर यांना पत्र देऊन सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अहवाल सादर करावा असे कळविले होते. गटशिक्षणाधिकारी बदनापूर यांनी विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुख यांना पत्र देऊन चौकशी करण्याच्या सूचना देत असा खो-खो चा खेळ सुरू ठेवला व चौकशी अधांतरीच राहिली. शेवटी अन्यायग्रस्त शिक्षकांनी उपोषणाचा इशारा देताच जिल्हा परिषद प्रशाला बदनापूर या ठिकाणी शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख त्यांनी प्रत्यक्ष शाळेवर न जाताच अन्यायग्रस्त शिक्षकांचे जबाब घेतले.१३ऑगस्ट २०२५ ला सुद्धा शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी अध्यक्ष सचिव कै. नानासाहेब वाघ शिक्षण प्रसारक मंडळ नाव्हा द्वारा संचलित मुख्याध्यापक कै नानासाहेब वाघ विद्यालय नजीक पांगरी यांना अन्यायग्रस्त शिक्षकांच्या सर्व मागण्या ह्या आपल्या शालेय स्तरावरील असून त्या पूर्ण कराव्यात व त्यांना उपोषणापासून परावृत्त करावे असे कळवले या पत्राला केराची टोपली दाखवत माननीय उपाध्यक्ष यांनी स्वातंत्र्य दिनानंतर आपल्या मागण्या मान्य करण्यात येईल असे अन्यायग्रस्त शिक्षकांना कळवले परंतु उपोषण कर्ते आपल्या न्याय मागण्यावर ठाम होते.मराठवाडा शिक्षक संघाचे पदाधिकारी व त्यांचे शिष्टमंडळ यांनी शिक्षणाधिकारी यांची भेट घेतली तेव्हा शिक्षणाधिकारी यांनी संदर्भीय प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी चार सदस्य समिती नेमली त्यात पथक प्रमुख मनोज कोल्हे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती जालना,श्री रवी जोशी प्रभारी उपशिक्षणाधिकारी माध्यमिक जालना, श्रीमती विनया वडजे उपशिक्षणाधिकारी प्राथमिक जालना, श्री शिनगारे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंबड यांना १० दिवसात चौकशी करून अहवाल सादर करावा असे आदेशित केले त्यामुळे उपोषणकर्त्यांनी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला उपोषण तात्पुरते स्थगित केले व सदरील प्रकरणाची चौकशी करून मागण्या मान्य झाल्या नाही आणि अन्याय करणाऱ्या मुख्याध्यापक तथा सचिव यांच्यावर योग्य ती कारवाई झाली नाही तर उपोषण पूर्ववत सुरू केल्या जाईल असा इशारा देण्यात आला आहे व त्याचप्रमाणे उपोषणकर्त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने सुद्धा तीव्र आंदोलनाचा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे उपोषणा दरम्यान मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवटे, सदस्य प्रेमदास राठोड, आर एफ कुरेशी, जिल्हा सचिव संजय येळवंते, कोषाध्यक्ष नारायण मुंडे, मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे, कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद, उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे, सहसचिव प्रद्युम्न काकड,प्रसिद्धी प्रमुख पटेल,युवा शहराध्यक्ष सोहम बोदवडे, माजी सिनेट सदस्य डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ तथा भगतसिंग शिक्षक व शिक्षकेतर पतसंस्था संचालक भागवत काकडे, महिला प्रतिनिधी शिरीन बेगम शहा, मन्सूर शेख,रशीद शेख, संजय चव्हाण, गणेश मेहेत्रे,सचिन अंबडकर,राहुल साळवे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी केदार, मार्गदर्शक तथा सेवानिवृत्त शिक्षक गौतम बनसोडे, प्रा दत्ता देशमुख, प्रा राज्यक्रांती वलसे यांची विशेष उपस्थिती होती

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
सोमवार १८ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com




# अण्णा आता तरी उठा! पुण्यातील पोस्टरवरून अण्णा हजारे भडकले; म्हणाले, मी 90 व्या वर्षीही...

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे हे आंदोलनासाठी ओळखले जातात. अशातच पुण्यात अण्णा हजारे यांचा फोटो असलेला एक बॅनर लावण्यात आला आहे. यावर 'आता तरी उठा अण्णा, मतांची चोरी झाली आहे,' असा मजकूल लिहिलेला आहे. अण्णांना याद्वारे आंदोलन करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र या बॅनरवरून अण्णा हजारे भडकले आहेत. वयाच्या 90व्या वर्षीही काम करावं का? असा प्रतिप्रश्न अण्णांनी केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. माझ्या प्रयत्नांमुळे 10 कायदे अस्तित्वात आले

पुण्यातील या बॅनरबाबत अण्णा हजारे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावर बोलताना अण्णा म्हणाले की, 'आतापर्यंत मी भरपूर काम केले आहे. भ्रष्टाचार होऊ नये यासाठी आंदोलने केली आहेत. माझ्यामुळे या देशात दहा कायदे झाले. माहितीच्या अधिकाराचा कायदा माझ्यामुळे मिळाला. देशात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदलीचा कायदा, लोकपाल, लोकायुक्त असे कायदे माझ्या प्रयत्नांमुळे अस्तित्वात आले आहेत.' मी 90 व्या वर्षीही काम करायचं का? पुढे बोलताना अण्णा म्हणाले की, 'आता माझं वय झालं आहे. मी 90 वर्षांचा झाल्यानंतरही काम करायचे आणि तुम्ही झोपून राहायचे? अशी जर कोणी अपेक्षा करत असेल तर ते चूकीचे आहे. माझ्याकडे बोट दाखविण्यापेक्षा मागच्या काळात मी






जे केले ते आजच्या तरुणांनी करावे असं विधान अण्णा यांनी बॅनर लावणाऱ्यांना केलं आहे. तरुणांनी आता जागं व्हायला हवं – अण्णा हजारे तरुणांना सल्ला देताना अण्णा म्हणाले की, 'आजपर्यंत मी जे केलं, ते आता तरुणांनी करावं. त्यांचं या देशाप्रती कर्तव्य आहे. कारण तेही या देशाचे नागरिक आहेत. फक्त बोट दाखवून 'हे करा, ते करा' म्हणणं चुकीचं आहे. यातून काहीही साध्य होणार नाही. तरुणांनी आता जागं व्हायला हवं' असं अण्णा हजारे यांनी म्हटलं आहे. दरम्यान, अण्णा हजारे यांनी दिल्लीत 2012 साली लोकपाल विधेयकासाठी आंदोलन केलं होतं. मात्र त्यानंतर ते आंदोलनांपासून दूर आहेत.

# युवा उद्योजक दत्ताराम उर्फ बाबा टोपले समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

दोडामार्ग-सामाजिक दायित्व, परोपकारी व्यक्तीमत्व, जनसामान्यांचे नेतृत्व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील समाजसेवक, युवा उद्योजक दत्ताराम उर्फ बाबा टोपले.हरहुन्नरी कार्यकर्ता, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकिय,सहकार,कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रातील कार्याची दखल जनजागृती सेवा संस्था, बदलापूर, महाराष्ट्र या सामाजिक संस्थेने घेतली.जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात युवा उद्योजक दत्ताराम उर्फ बाबा टोपले यांना'समाजरत्न'पुरस्काराने गौरविण्यात आले.सिंधुदुर्ग जि.प.च्या माजी सदस्या, कणकवली नगरपंचायतीच्या माजी




नगरसेविका सौ.राजश्री धुमाळे यांच्या हस्ते सन्मानपत्र, भेटवस्तू, संस्थेचा आरती संग्रह व कार्य अहवाल अशा स्वरुपातील हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.याप्रसंगी वेतोबा सिरीयल मध्ये गावमामी, अभिनेत्री, सिंधुदुर्ग फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ.अक्षता कांबळी,वास्को-गोवा निवृत्त शिक्षिका-को-ऑर्डीनेटर मुंबई,गौमांतकीय कवयित्री,गोवा राज्य समन्वयक श्रीमती.शुभांगी गुरव, साईकृपा कन्स्ट्रक्शनचे संस्थापक, साईभक्त, समाजसेवक राजू मानकर, महाराष्ट्र शासनातील सेवा निवृत्त अधिकारी चंद्रशेखर उपरकर,संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते.हा पुरस्कार वितरण सोहळा श्री.भवानी सभागृह,तेली आळी,कणकवली येथे संपन्न झाला.यावेळी दत्ताराम उर्फ बाबा टोपले यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. युवा उद्योजक दत्ताराम उर्फ बाबा टोपले दोडामार्ग तालुक्यातील कर्तृत्ववान, कर्तबगार, प्रतिभावंत व्यक्तीमत्व म्हणून परिचित आहेत. त्यांना समाजरत्न पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

## श्रीकृष्ण जन्माष्टमी निमीत्त 80 तुळशीची रोप लागवड निसर्गप्रेमी सुमित राठोड



नागपूर दि.१६ ऑगस्ट २०२५ ला श्रीकृष्ण जन्माष्टमी या शुभ दिनी निसर्ग प्रेमी सुमित राठोड यांनी मा.विशेष पोलीस महानिरीक्षक राज्य राखीव पोलीस बल नागपूर कार्यालय परिसर मधील दोन्ही कॅरी मध्ये ५० तुळशीचे रोप लागवड केली तसेच आपल्या घराच्या परीसर मध्ये ३० तुळशीचे रोप लागवड करुन श्रीकृष्ण जन्माष्टमी साजरी केली आहे आपल्या भारतीय संस्कृतीत तुळशीच्या महत्त्व खुप आहेत तुळशी २४ तास प्राणवायु देतो तुळशीचे रोप औषधी गुणकारी आहे सोबतच तुळशीचे रोप माता सिताचे रुप मानले जाते सुमित राठोड यांनी याच ठीकाणी मागील वर्षी सुध्दा ५० तुळशीचे रोप लागवड केली होती जी आता साधारण ३ ते ४ फुटांची झाली आहेत यापासुन मिळणारे शुध्द प्राणवायु २४ तास मिळत आहेत आरोग्य करिता खुप फायदेशीर आहेत सुमित राठोड सर्वांना आव्हान करत आहे की सर्वांनी आपल्या घरात तुळशीचे जास्तीत जास्त रोप लागवड करावी व आपले आरोग्य चांगले राहण्यासाठी आपल्याला फायदेशीर आहेत.

## महालक्ष्मी गडावर दरड कोसळली; चार दुकाने दरीत, जीवितहानी टळली



डहाणू (प्रतिनिधी) — डहाणू तालुक्यातील प्रसिद्ध महालक्ष्मी गडावर शनिवारी (१६ ऑगस्ट) मुसळधार पावसामुळे मोठी दरड कोसळली. या घटनेत गडावरील सात दुकानांपैकी चार दुकाने थेट दरीत कोसळली असून उर्वरित दुकानांवर दगड कोसळल्याने नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नसल्याची प्राथमिक माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.दरड कोसळल्याने मंदिर परिसर हादरला. कोसळलेल्या दगडांमुळे मंदिराकडे जाणारा अरुंद रस्ता देखील अंशतः बाधित झाला आहे. मात्र मुसळधार पावसामुळे भाविकांची वर्दळ कमी असल्याने मोठा अपघात टळला.महालक्ष्मी गडाच्या सुळक्यावरून दरडी कोसळण्याचे प्रकार गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. २०२२ साली अशाच प्रकारच्या दुर्घटनेत तीन दुकानांचे नुकसान झाले होते. तरीदेखील या ठिकाणी सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत, अशी स्थानिकांची प्रतिक्रिया आहे.

# स्वातंत्र्य दिन व सत्कार सोहळा

देवळाली कॅम्प,कॅन्टोन्मेंट हायस्कूल मध्ये भारतीय 79 वा स्वातंत्र्य दिन विविध कार्यक्रमांने व देशभक्ती गीताने साजरा केला, यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्डाचे अध्यक्ष ब्रिगेडीयर श्री पांडे साहेब, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मणी त्रिपाठी साहेब, केंद्र सरकार नवनियुक्त उपाध्यक्ष मा सचिनभाऊ ठाकरे, सहाय्यक कार्यकारी अधिकारी ज्ञानेद्र तेजाळे साहेब, ऑफिस ओ एस मा विवेक बंड साहेब शाळेच्या प्रिन्सिपल राजश्री खैरनार मॅडम,मुख्याध्यापिका माधुरी कुलकर्णी मॅडम ,कॅ.बो माजी उपाध्यक्ष व नगरसेवक बाबुराव मोजाड, दिनकर पाळदे ,तानाजी



करंजकर, भगवान कटारीया,आशाताई गोडसे प्रभावती धिवरे,नितुताई गोडसे, मा.जिल्हाअधिकारी भिमराव धिवरे साहेब,रिपाई नासिक जिल्हा उपप्रमुख आर,डी,जाधव ,रिपाई देवळाली कॅम्प मा.शहरध्यक्ष पडित साळवे , जिल्हा नेते



संजय जाधव ,रोटरी कल्बचे अध्यक्ष नरेश दोसी ,सह मान्यवर उपस्थित होते यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्ड हायस्कूलचे माजी विद्यार्थी समाज भुषण मा.सुभाष पोपटराव बोराडे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुंबई येथे देण्यात आला म्हणून कॅन्टोन्मेंट हायस्कूलचे माजी विद्यार्थी व रिपाई नासिक जिल्हा उपप्रमुख मा सुभाष बोराडे यांचा प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत विशेष सत्कार फुलाचे वृक्ष रोपटे व तिरंगी शाल देवून सत्कार करण्यात आला.पर्यवेक्षक प्रमोद वैद्य,शिक्षक रोहिणी निकम , जगदिश धोंगडे,पंकज निसाळ,पोपट खंडीजोड , सुवर्णा गिते सह यावेळी कॅन्टोन्मेंट बोर्डचे कर्मचारी,शाळेचे शिक्षकवृंद, पालकवर्ग व शालीय विद्यार्थी उपस्थित होते , शाळेच्या वतीने सर्व प्रमुख अतिथीचे वृक्ष देवून सत्कार करण्यात आला.

# अजित पवारांनी गुंडांची टोळी पोसली- विजयकुमार घाडगे
# शेतकऱ्यांची कर्जमाफी न केल्यास नेत्यांना गावात फिरू देणार नाही

**बीडमध्ये पत्रकार परिषद : शेतकऱ्यांचा पोरावरील हल्ल्याचा बदला शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करून घेणार- विजय कुमार घाडगे**

प्रतिनिधी | बीड
शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे सोडून राज्याचे कृषी मंत्री सभागृहात रम्मी खेळत असल्याने आंदोलनाचा भाग म्हणून आम्ही सुनिल तटकरे यांना लातूर मध्ये पत्ते भेट दिले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या गुंडानी माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. अजित पवार यांनी कृषी मंत्री यांच्याबद्दल निर्णय घेतला मात्र हल्ला करणाऱ्या गुंडांचा सन्मान करून त्यांना पक्षात मोठ स्थान दिलं. शेतकऱ्यांच्या पोराने शासनाला प्रश्न विचारले तर राष्ट्रवादीचे हे गुंड त्यांच्यावर हल्ला करत आहेत. हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. आम्ही याचा बदला शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रूपये, सोयाबीनला ८ हजार रूपये हमी भाव घेऊन आणि पिक विमा शेतकऱ्यांच्या पदरात पाडून अशा भ्याड हल्ल्याचा बदला घेणार असल्याचे अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी केले. ते बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्षा अशोक रोमन यांच्यासह छावाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना विजयकुमार घाडगे म्हणाले की, राष्ट्रवादीच्या गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्यानंतर चार दिवसाच्या उपचारांनंतर मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. तेव्हा अजित पवार म्हणाले ज्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केला त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही. माणिकराव कोकाटे यांच्या बद्दल योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. कृषी मंत्री यांच्या



बदद्ल अजित पवार यांनी निर्णय घेतला मात्र, आमच्या जखमा ओल्या असताना आमच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांना पक्षाच्या फादर बॉडीत घेऊन अजित पवार यांनी नविन पायंडा पाडला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असा समज झाला आहे. की शेतकऱ्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट आहे. शेतकऱ्यांच्या पोराला मारहाण करण्यासाठी अजित पवार यांनी गुंडांची टोळी ठेवली आहे. जशास तसे उत्तर छावा संघटना देत आहे. मात्र आम्ही या सरकारकडून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्याचा बदला पूर्ण करणार आहोत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करूण घेणार आहोत. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाही तर नेत्यांना गाव बंदी करणार आहोत. असे विजयकुमार घाडगे म्हणाले.

## अशोक रोमन यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी

अशोक रोमन यांनी बीड जिल्ह्यातील गोरगरीबांच्या प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी सोडवण्याचा प्रामाणीक प्रयत्न केला आहे. या सोबतच युवकांची मोठी फळी त्यांच्या मागे आहे. लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिली.
या पत्रकार परिषेदेला अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन, संभाजीनगर जिल्हाप्रमुख अशोक मोरे पाटील, लातूर जिल्हा प्रमुख दीपक नरवडे, जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे यांच्यासह विद्यार्थी आघाडी प्रमुख पप्पू लांडे पाटील, शहर प्रमुख सचिन हरणमारे, पप्पू शिंदे, पप्पू मस्के पाटील, दत्ता काशीद, दत्ता साळुंके, शंकर,श कुरळे, बाळू कदम, विठ्ठल अण्णा काळे, सिद्दिकी फारुकी, वाजेद खान, अविनाश हातागळे, अमोल अंकुटे, सतीश मस्के, गिरीश करवा आदी उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com